# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या १४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शनिवार, दि.१९ नोव्हेंबर, २०१६ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची १४ वी बैठक दि.१९ नोव्हेंबर, २०१६ रोजी दुपारी १२:०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ३) | श्री. मते एच. बी., संचालक विद्यार्थी कल्याण मंडळ | सदस्य |
| ४) | डॉ. घुटे व्ही. बी., प्र. ग्रंथपाल | सदस्य |
| ५) | आमदार श्री. प्रशांत परिचारक, विधानपरिषद सदस्य | सदस्य |
| ६) | डॉ. मिश्रा डी. एन., कुलसचिव | सचिव |

**स्वागत:**

मा. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

डॉ. देशपांडे एस. एम., विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, सोलापूर मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), पुणे यांचे प्रतिनिधी, डॉ. नंदनवार डी. आर., विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, पुणे मा. शिक्षण संचालक (तंत्र शिक्षण) मुंबई यांचे प्रतिनिधी, मा. आमदार श्री. गणपतराव देशमुख, विधानसभा सदस्य, मा. आमदार श्री. दिलीप सोपल, विधानसभा सदस्य यांनी अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थित राहण्याची दूरध्वनीद्वारे विनंती केली. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. मा. संचालक, डी. एम. ई. आर. मुंबई हे या बैठकीस अनुपस्थित होते.

मा. आमदार श्री. प्रशांत परिचारक, विधानपरिषद सदस्य यांचे अधिसभेवर नामनिर्देशन झाल्यानंतरची ही पहिली बैठक असल्याने मा.कुलगुरुंनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

कुलसचिवांनी परिनियम ४७४ (१) नुसार, मा.कुलगुरुंना तेराव्या अधिसभेच्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील विद्यापीठातील घडामोडीचा आणि प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

**"अ" कुलसचिव कार्यालय:**

१. काही विषयांच्या अभ्यासक्रमातील किरकोळ दुरुस्ती तसेच काही विषयांचे अभ्यासक्रम निवड आधारित श्रेयांक प्रणाली (CBCS-True Spirit) नुसार तयार करुन विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले तसेच महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे देखील कळविण्यात आले.

२. श्री. लक्ष्मण शंकर कदम, कक्षअधिकारी, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांनी दि.१९/०८/२०१६ रोजी विद्यापीठातील एम.ए. भाग १ व २ जनसंज्ञापन (Mass-Communication) या विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस **"कु. प्रिया लक्ष्मण कदम"** या नावाने सुवर्णपदक सुरु करण्यासंदर्भात विद्यापीठास धनादेशाद्वारे ₹१,०५,०००/- दिले आहेत, त्यासंदर्भात सदरचे सुवर्णपदक शै. वर्ष २०१५-१६ मधील उत्तीर्ण विद्यार्थ्यास प्रदान करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात आली.

३. डॉ. वसंतराव गणपत बनसुडे व प्रा. रंजना वसंतराव बनसुडे यांनी दि. ०६/०९/२०१६ रोजीच्या अर्जान्वये अनुक्रमे सोलापूर विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयात एम.कॉम. व बी.एस्सी. मायक्रोबायोलॉजी या विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस **"प्राचार्य डॉ.वसंतराव गणपत बनसुडे सुवर्णपदक"** व **"स्व. कु. अंजली वसंतराव बनसुडे"** या नावाने सुवर्णपदक प्रदान सुरु करण्यासंदर्भात विद्यापीठास धनादेशाद्वारे प्रत्येकी ₹१,०६,०००/- दिले आहेत, त्यासंदर्भात सदरचे सुवर्णपदक शै. वर्ष २०१५-१६ मधील उत्तीर्ण विद्यार्थ्यास प्रदान करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात आली.

४. अहवाल कालावधीमध्ये शै. वर्ष २०१६-१७ करीता सर्व बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. (Enterpreneurship & Biotech) या पदवी अभ्यासक्रमाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्रानुसार १२ वी पूरवणी परीक्षमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश व पात्रता अर्ज सादर करण्याबाबतच्या तारखा निश्चित करुन याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

५. इतर विद्यापीठातून प्रस्तुत विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या विषयी तयार केलेली नियमावली अद्यावत करण्यासाठी सर्व विद्याशाखांच्या मा. समन्वयकांची बैठक २५/०७/२०१६ रोजी आयोजित करुन सदर नियमावली अद्ययावत करण्यासंबंधी प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

६. शै. वर्ष २०१६-१७ मध्ये विद्यापीठातील विविध संकुल पदव्युत्तर अभ्यासक्रमास एकूण ८५९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहेत. या पैकी मागसवर्गीय (SC, ST, NT, OBC, SBC) या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरण्याचे काम पूर्ण झाले आहे. तसेच एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेचे / सेंटर सेक्टर शिष्यवृत्ती व अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना तसेच आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय (ई.बी.सी.) इत्यादी शिष्यवृत्ती अर्ज छाननी करुन प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु आहे. आर्थिक दृष्ट्यामागासर्गीय (ई.बी.सी.) एकूण ८१ विद्यार्थी असून त्यांचे मा. लेखाअधिकारी उच्च शिक्षण, सोलापूर विभाग सोलापूर यांच्याकडे दि.१६/०९/२०१६ रोजी प्रस्ताव तपासणीसाठी पाठविण्यात आला.

७. शै. वर्ष २०१४-१५ मध्ये मागासर्गीय विद्यार्थ्यांचे (एस.बी.सी.) एकूण २९ विद्यार्थ्यांची ₹२,४१,९१०/- इतकी रक्कम प्राप्त झाली असून सदरची रक्कम विद्यार्थ्यांच्या नावे फी पोटी वर्ग करण्यासाठी वित्त व लेखा विभागाकडे कळविण्यात आली आहे.

८. अहवाल कालावधीमध्ये एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. व एम.सी.ए. या अभ्यासक्रमाच्या प्रवेश पूर्व परीक्षेची शुल्क एम.के.सी.एल. एकूण ₹८,३९,७००/- इतकी रक्कम प्राप्त झाली असून सदरची रक्कम वित्त व लेखाविभागाकडे फी पोटी वर्ग करण्यास कळविण्यात आले आहे.

९. सोलापूर विद्यापीठाचा सन २०१४-१५ मधील ११ वा मराठी व इंग्रजी वार्षिक अंकात योग्य त्या दुरुस्त्या तसेच मुखपृष्ठांची निवड करण्यात आली आहे. वार्षिक अहवालाचे काम पूर्ण झाले असून प्रेसमधून तयार करण्यात आलेल्या वार्षिक अहवालाच्या मसूद्याची प्रत व्यवस्थापन परिषदने मान्य करुन आता आगामी अधिसभेच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्यात येईल.

१०. दि.०५/०९/२०१६ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने दि.०६/०९/२०१६ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून मा. कुलगुरुमहोदयांच्या हस्ते प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व संकुलातील संचालक, अध्यापक व संवैधानिक अधिकारी यांचा श्रीफळ, पान, सुपारी व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

११. सोलापूर विद्यापीठात लोकदैवत श्री विठ्ठल अध्यासन केंद्र सुरु करण्याबाबत सर्वंकष प्रस्ताव तयार करुन मा. कुलगुरुमहोदयांच्या आदेशानुसार मा. संचालक, (उच्च शिक्षण), पुणे यांना पाठविण्यात आले असून त्याची प्रत मा. प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई व मा. विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर यांना पाठविण्यात आली आहे.

१२. सामाजिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. ई. एन. अशोककुमार उर्जात्मक शिक्षण (Energy Education) व Foresight Study Centre या प्रकल्पासाठी University of Turku Finland व सोलापूर विद्यापीठ यांच्यात करार करण्यासंदर्भात चर्चा व नियोजन करण्यासाठी दि.३०/०८/२०१६ ते ०९/०९/२०१६ या कालावधीत फिनलंड येथे गेले होते.

१३. वर्ग ३ व ४ या संवर्गातील रिक्त पदांच्या भरतीची प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झालेली असून एकूण ०१ ग्रंथालय परिचर, ०१ प्रयोगशाळा परिचर, ०५ शिपाई, २२ कनिष्ठ लिपीकांपैकी १६ कनिष्ठ लिपिक, ०१ लघूटंकलेखक व एक सांख्यिकी सहायक रुजू झाले आहेत. रुजू झालेल्या सेवकांना विविध प्रशासकीय विभागाच्या व संकुलाच्या गरजेनूसार त्यांची पदस्थापना करण्यात आली आहे. तसेच ११ महिन्याच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात Civil Engineer, Technical Assistance, Hardware Software Network Expert या पदांच्या Walk in Interview द्वारे मुलाखती घेवून नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले आहे. टेक्निकल असिस्टंट, ज्युनिअर

इंजिनिअर, संगणक हार्डवेअर, सॉफ्टवेअर ॲन्ड नेटवर्क एक्सपर्ट या पदांवर एका वर्षाकरिता नियुक्त केलेले प्रशासकीय सेवक रुजू झालेले आहेत.

१४. शाहीर अमर शेख अध्यासन केंद्र सुरु करण्यासंदर्भातील सर्वंकष प्रस्ताव मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पत्र क्र. सोविसो/आस्था/२०१६/८९८६ दि. २१/०९/२०१६ अन्वये पाठविण्यात आला आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामधील शाहीर अमर शेख यांचे योगदान अतुल्य आहे. शूरवीर आणि शाहीरांच्या महाराष्ट्र अशी ओळख असलेल्या महाराष्ट्रात आज शाहिरी परंपरा अखेरचा श्वास घेत आहे. कै. शाहीर अमर शेख यांच्या कार्यकर्तृत्वाची महाराष्ट्रातील शाहीरी परंपेरची ओळख नवीन पिढीला करुन देण्यासाठी शाहीर अमर शेख यांच्या शंभराव्या जयंती निमित्त महाराष्ट्र शासनाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी लढणाऱ्या या महान लोककलावंताला आदरांजली अर्पण करण्याकरिता प्रस्तुत विद्यापीठाने एक कार्यक्रम समारंभ प्रस्तुत विद्यापीठात आयोजित केला.

१५. डॉ. घनवट ए. ए., सहयोगी प्राध्यापक, रसायनशास्त्र संकुल हे दि. २९/०९/२०१६ ते १०/१०/२०१६ या कालावधीत जेजू, दक्षिण कोरिया येथे आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये, संशोधन पेपर सादर करण्यासाठी सहभाग नोंदविला. त्यांना या करिता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून १२ व्या पंचवार्षिक योजने अंतर्गत प्राप्त निधीतून अनुदान मंजूर करण्यात आले.

१६. वर्ग ३ व ४ संवर्गातील नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन मान्यता प्रस्ताव मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्याकडे सादर करण्यात आले आहेत.

१७. सोलापूर विद्यापीठाचा सन २०१५-१६ चा १२ वा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठास प्राप्त माहिती एकत्रित करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

१८. मा. प्रा. बी. एस. चौहान, अध्यक्ष, ७ वा वेतन रिव्हिव्यू समिती, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे अवलोकन दि. ३०/०८/२०१६ रोजीचे पत्र क्र. D.O.No. F १-३/२०१६ (PS/PRC) व आस्थापना (शिक्षक) विभागाची दि. १२/०९/२०१६ रोजी उपलब्ध असणारी प्रश्नावलीची माहिती एकत्रित करण्यात आली आहे.

१९. मा. डॉ. धनराज माने, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे क्र. उशिसं/एमअयएस /२०१६-१७/सांख्यिकी/१०९५२ दि. २३/०९/२०१६ नुसार (अभियांत्रिकी विद्याशाखा वगळून) सर्व संलग्नित महाविद्यालयांना माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHEMIS) या पोर्टलवर सन २०१५-१६ या वर्षाची माहिती नोंदण्याबाबत दि. १०/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले.

२०. "मुली शिकवा समाज घडवा" या योजनेसाठी विविध संकुलांकडून प्रस्ताव प्राप्त झाले असून सदर प्रस्तावानुसार प्रत्येक संकुलातील विद्यार्थिनीची निवड करण्यासाठी गठीत केलेल्या समितीची दि.२१/१०/२०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली.

२१. श्री. सुशीलकुमार संभाजीराव शिंदे यांनी दि. १५/०९/२०१६ रोजी सोलापूर विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयात बी.ए. भाग-३ राज्यशास्त्र या विषयात प्रथम येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनीस "श्री. सुशीलकुमारजी शिंदे सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक प्रदान सुरु करण्यासंदर्भात विद्यापीठास धनादेशाद्वारे प्रत्येकी ₹१,०८,०००/- दिले आहेत, त्यासंदर्भात सदरचे सुवर्णपदक शै. वर्ष २०१५-१६ मधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांस प्रदान करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली.

२२. श्री. सदाशिव दिगंबर शिरवळकर यांनी दि. २०/०९/२०१६ रोजी सोलापूर विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयात बी.ए. भाग-३ हिंदी स्पेशल या विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस "कै. प्रभाकर दिगंबर शिरवळकर सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक प्रदान सुरु करण्यासंदर्भात विद्यापीठास धनादेशाद्वारे प्रत्येकी ₹१,०८,०००/- दिले आहेत, त्यासंदर्भात सदरचे सुवर्णपदक शै. वर्ष २०१५-१६ मधील उत्तीर्ण विद्यार्थ्यास प्रदान करण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली.

२३. "कॉ. प्रभाकर यादव व्याख्यानमाला २०१६" प्रा. डॉ. व्ही. बी. जुगळे, माजी विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे "सहकारी बँकांचा बदलता व्यावसायिक दृष्टिकोन" या विषयावर दि. २८/०९/२०१६ रोजी व्याख्यान संपन्न झाले. उक्त व्याख्यानाचा लाभ हा प्रस्तुत विद्यापीठाच्या संकुलातील व सलंग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतला.

२४. अहवाल कालावधीमध्ये शै. वर्ष २०१६-१७ करीता फार्मसी, अभियांत्रिकी, आर्किटेक्चर व एम.बी.ए., एम.ई., एम.फार्मसी., बी.एड्, बी.पी.एड्, एम.एड्, एम.पी.एड्, बी.ए.एल.एल.बी. या पदवी व पदव्युत्तर या अभ्यासक्रमाचे पात्रता अर्ज स्विकारण्याच्या तारखा निश्चित करुन याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. फार्मसी, अभियांत्रिकी, आर्क्टिटेक्चर व एम.बी.ए., एम.ई., एम.फार्मसी. या अभ्यासक्रमांचा महाविद्यालयांनी Upload केलेला Student Data Provissional Eligible करण्यात आला आहे. तसेच या सर्व अभ्यासक्रमांचे पात्रता अर्ज व शुल्क विभागात जमा करुन घेण्यात आले.

२५. अहवाल कालावधीमध्ये शै. वर्ष २०१६-१७ करीता थेट द्वितीय वर्ष फार्मसी, अभियांत्रिकी, पदवी या अभ्यासक्रमाचे पात्रता अर्ज स्विकारण्याच्या तारखा निश्चित करुन याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. या अभ्यासक्रमांचा महाविद्यालयांनी Upload केलेला Student Data Provissional Eligible करण्यात आला आहे. तसेच या सर्व अभ्यासक्रमांचे पात्रता अर्ज व शुल्क विभागात जमा करुन घेण्यात आले आहेत.

२६. अहवाल कालावधीमध्ये शै. वर्ष २०१६-१७ करीता D.T.E. कडून प्रवेश प्रक्रिया होणारे अभ्यासक्रम वगळता उर्वरीत सर्व अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रणालीद्वारे Provisional Eligible करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

२७. अहवाल कालावधीमध्ये शै. वर्ष २०१४-१५-१६ करीता प्रवेशित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र, एम.ए. (सर्व विषय), एम. कॉम., एम.एस्सी. (सर्व विषय), एम.सी.ए., पी.जी.डी.सी.ए., डी.बी.एम., एम.एस.डब्ल्यू., एम.बी.ए. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जातील त्रुटीं संबंधित महाविद्यालयांना व विद्यापीठातील संकुलांना ३१/१२/२०१५ पूर्वी ऑनलाईन कळविण्यात आल्या होत्या. या मुदतीनंतर त्रुटींची पूर्तता केलेल्या व पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांची ₹५००/- प्रमाणे दंडाची रक्कम आकारणी करुन पात्रता कायम करण्यात येत आहे.

२८. विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाकडून करिअर गाईडन्स व्याख्यान आयोजनासाठी काही अंशी अनुदान मागणीच्या प्रस्तावांची मा. कुलगुरुमहोदयांनी गठित केलेल्या समितीकडून छाननी/पडताळणी होऊन त्यापैकी ०८ महाविद्यालयांना काही अंशी आर्थिक सहाय्य अनुदान रक्कम मंजूर करण्यात आली आहे. तसेच काही महाविद्यालयांनी विहित नमुन्यात प्रस्ताव सादर न केल्याने अशा महाविद्यालयांना सुधारित फेर प्रस्ताव सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या, तद्नंतर प्राप्त प्रस्तावांची पुन:श्च छाननी/पडताळणी करुन त्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात आला.

**"ब" महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ (बी.सी.यु.डी.) विभाग:**

१. शै. वर्ष २०१६-१७ करिता जनविकासकेंद्रांतर्गत सुरु असलेल्या एका वर्षाच्या व सहा महिने कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे पात्रता फॉर्म दि. ३० सप्टेंबर, २०१६ पर्यंत मागविण्यात आले होते.

२. जनविकासकेंद्राशी संलग्नित सर्व संस्था / महाविद्यालयातील प्राचार्य / संचालक / समन्वयकांची बैठक दि.०३/०९/२०१६ रोजी आयोजित करण्यात आली होती. यात ४० प्राचार्य / संचालक / समन्वयक उपस्थित होते. त्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीमधील सूचना व मुद्दे यावर अंतिम नियमावली तयार करण्यासाठी मा.संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

३. अविष्कार संशोधन नियतकालिक २०१५, Vol-४ हे अविष्कार संपादक मंडळातील सर्व सदस्यांना, संशोधकाना, सर्व महाविद्यालये, महाराष्ट्रातील सर्व कृषी/अकृषी विद्यापीठाचे मा. कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक, महाविद्यालय विद्यापीठ विकास मंडळ यांना पाठविण्यात आले. तसेच मा. राज्यपाल यांचे सचिव, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री, उच्च शिक्षण संचालक पुणे, विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग यांनाही सदरचे अविष्कार संशोधक नियतकालिक पाठविण्यात आले.

४. अविष्कार संशोधन नियतकालिक २०१६, Vol-५ साठी सर्व संलग्नित महाविद्यालये, विद्यापीठातील संकुले, संशोधन मार्गदर्शक व संशोधक विद्यार्थी यांच्याकडून दि.१५ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत संशोधन लेख मागविण्यात आले. दि. १५ ऑक्टोबर २०१६

पर्यंत एकूण ३३ संशोधन लेख प्राप्त झाले आहेत.

५. भारत महाविद्यालय, जेऊर (म.रेल्वे), ता. करमाळा या महाविद्यालयातील डॉ. कांबळे एस. एस. (मराठी), डॉ. वाघमोडे एस. एम. (इतिहास) यांना सहाय्यक प्राध्यापक संवर्गातून सहयोगी प्राध्यापक संवर्गात पदोन्नती देण्यात आली. तसेच डॉ. गाडेकर एन. डी. (हिंदी) वसुंधरा कला महाविद्यालय येथील डॉ. एस. जे. गायकवाड (हिंदी), माऊली महाविद्यालय, वडाळा येथील डॉ. सुर्यवंशी पी.एल. (इंग्रजी), श्री. म्हमाणे व्ही. एन. (इंग्रजी), श्रीमती बिरादार पी. आर. (रसायनशास्त्र), श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथील श्री. दामाजी शंकर भिसे (वनस्पतीशास्त्र), श्री. सोमनाथ विष्णू यादव (इंग्रजी) यांची स्टेज-१ ते २ मध्ये स्थाननिश्चिती करण्यात आली.

६. विद्यापीठाच्या स्वयं:मूल्यनिर्धारण अहवालामधील Criteria No. ३.१.३ "Seed Money for Research" या योजनेतंर्गत सर्व संकुले व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांचे संशोधन प्रस्ताव मागविण्यात आले.

७. शै. वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ मध्ये एम.फिल., पी.एच.डी. या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची तपासणी करुन ज्या विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केली नाही, अशा विद्यार्थ्यांच्या नावांची यादी तसेच पात्र विद्यार्थ्यांच्या नावांच्या याद्या देखील संबंधित महाविद्यालयांना आणि महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ (बी.सी.यु.डी.) यांना पाठविण्यात आल्या आहेत.

८. दि.०५/०८/२०१६ ते दि.१५/१०/२०१६ या कालावधीमध्ये १३ विद्यार्थ्यांना पी. एचडी. पदवी प्रदान करण्यात आली.

९. विद्यापीठांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये होणाऱ्या महाविद्यालयस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यासाठी महाविद्यालयांना प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे.

१०. प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शा.शि.संचालकांची रिक्त पदे भरण्यासाठी प्राप्त झालेल्या पाच प्रस्तावांची तपासणी करुन जाहिरातीच्या मसुदयास मान्यता देण्यात आली व या सर्व जाहिराती विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac या संकेत स्थळावर Employment Opportunities या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

११. प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित एका अनुदानित व एका कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षक पदांची व एका कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य पदाची बिंदुनामावली नोंदवहीची प्राथमिक तपासणी करुन देण्यात आली.

१२. विशेष कक्ष विभागात सहाय्यक प्राध्यापक पदासाठी दि.१५ सप्टेंबर, २०१६ ते दि.१५ ऑक्टोबर, २०१६ अखेर एकूण दोन मागासवर्गीय उमेदवारांनी नाव नोंदणी केलेली असून नाव नोंदणी केलेल्या उमेदवारांची नावे विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर “Special cell” या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात आली आहेत.

१३. मा. कुलगुरुमहोदयांनी गठित केलेल्या स्थायी समितीच्या उपसमितीच्या बैठकीत पारित ठरावानुसार व मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार संबंधित संकुलांना सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात सेट/नेट परीक्षा पेपर क्र. २ व ३ साठी प्रशिक्षण कार्यशाळा/शिबीर आयोजित करण्याबाबत कळविण्यात आले.

१४. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या, स्थानिक निवड समिती अहवालावर योग्य ती कार्यवाही करुन संबंधित महाविद्यालयास एकूण २५२ अध्यापकांना मान्यता असल्याचे कळविण्यात आले.

१५. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त विद्यापीठ विहित निवड समितीमार्फत प्राप्त शिफारशीनुसार ०९ शिक्षकांना परिविक्षाधीन कालावधीसाठी मान्यता देण्यात आली आहे.

१६. संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या, विद्यापीठ विहित निवड समिती अहवालानुसार संलग्नित महाविद्यालयातील एका प्राचार्यास मान्यता देण्यात आली.

१७. संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या, संबंधित महाविद्यालयातील रिक्त नियमित प्राचार्य पदी ०२ प्रभारी प्राचार्यास मान्यता देण्यात आली.

१८. Google Form मध्ये संलग्नित २० महाविद्यालयावरुन आलेली दुरुस्ती Update केली.

१९. SUS-PET-६ Ph.D. अभ्यासक्रमास युजीसीच्या जुलै २०१६ च्या पत्रान्वये नव्याने प्रवेश देण्यासाठी दि.१५ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये संबधित महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

२०. सर्व विद्याशाखाअंतर्गत विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळाच्या बैठका संपन्न झाल्या. सदर बैठकीत झालेल्या ठरानानुसार संबधितांना पत्र निर्गमित करण्यात आले.

२१. शैक्षणिक व प्रशासकीय मुल्यमापनाच्या दुस-या टप्प्याच्या कार्यवाहीस सुरुवात केलेली आहे.

२२. संलग्नित महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम / विषय / अतिरिक्त तुकडया / विद्याशाखा शै.वर्ष २०१६-१७ पासून सुरु करण्यास शासनाची मान्यता मिळालेली असून सदर नवीन अभ्यासक्रम / विषय / तुकडी / विद्याशाखा यांना संलग्निकरण देण्याची कार्यवाही सुरु आहे.

२३. प्रस्तुत विद्यापीठाच्या के.एन.भिसे आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज, कुर्डूवाडी ता.माढा, जि.सोलापूर या महाविद्यालयास निरंतर संलग्नकरणाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

२४. प्रस्तुत विद्यापीठाद्वारे एक रात्र महाविद्यालय, तीन अतिरिक्त तुकडयाची शै.वर्ष २०१६-१७ करीता प्रथम संलग्नीकरणा ची कार्यवाही सुरु आहे.

२५. शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज, ता.माळशिरस येथील डॉ. देवकर एस. एस. (रसायनशास्त्र), डॉ. गायकवाड आर. एल. (वाणिज्य), ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय येथील डॉ. यक्कलदेवी अे. एस. (समाजशास्त्र), डॉ. शिंदे टी. एन. (इतिहास) यांना सहाय्यक प्राध्यापक संवर्गातून सहयोगी प्राध्यापक संवर्गात पदोन्नती देण्यात आली.

२६. शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज, ता.माळशिरस येथील श्री. परकाळे जे. डी. (मराठी), ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय येथील डॉ. वडजे आर. के. (हिंदी) यांची स्टेज - २ व ३ मध्ये स्थाननिश्चिती करण्यात आली.

२७. श्री.वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर आणि ए. जी. पाटील इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर यांचे २ (f) चे प्रस्ताव मंजूरीकरिता युजीसी, नवी दिल्ली येथे पाठविण्यात आले.

२८. Welfare Scheme for Students/Teachers (e) Reimbursement fees for getting Lifetime membership of Govt. Recog. Professional Academic Society या योजनेतंर्गत प्रस्ताव संलग्नित सर्व महाविद्यालयाकडून मागविण्यात आले आहेत.

**"क" वित्त व लेखा विभाग:**

१. विद्यापीठाचे सन २०१५-१६ च्या सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१७-१८ चे मूळ अंदाजपत्रकाचे काम सुरु करण्यात आलेले आहे.

**"ड" परीक्षा विभाग:**

१. एप्रिल/मे, २०१६ मध्ये झालेलया परीक्षेच्या विविध विद्याशाखांच्या उत्तरपत्रिका फेरतपासणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

२. ऑक्टो/नोव्हे., २०१६ मध्ये होणाऱ्या बी.ए., बी. कॉम. व बी. एस्सी. (All) व इतर सर्व परीक्षांचे अंतिम वेळापत्रक (Final Programme) तयार करण्यात आले आहे.

३. दि. ०८ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट दरम्यान विविध विषयाची Ph. D. Course Work परीक्षा सुरळीत पार पडली.

४. बहिस्थ विद्यार्थ्यांची Online Admission प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

५. Indus Foundation या जागतिक स्तरावर उच्च शिक्षण क्षेत्रासाठी कार्य करणाऱ्या Foundation ने उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर करुन कामकाज सुलभ करणाऱ्या संस्थेस पुरस्कार घोषित केले. यामध्ये Awards for Education Technology ह्या जागतिक स्तरावरील पुरस्काराने सोलापूर विद्यापीठाला गौरविण्यात आले. तसेच सदरची दैदिप्यमान कामगिरी पार पाडणारे परीक्षा नियंत्रक श्री. बी. पी. पाटील यांनाही Excellence या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार मुंबई येथे माजी केंद्रीय माहिती आयुक्त श्री. शैलेश गांधी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. प्रशासकीय क्षेत्रासाठी दिला जाणारा पुरस्कार महाराष्ट्रात केवळ सोलापूर विद्यापीठासच प्राप्त झाला आहे.

६. एम.एस्सी. व एम.सी.ए. सायन्स या अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका या वेळी प्रायोगिक तत्वावर ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याचा धोरणात्मक निर्णयानुसार या परीक्षा केंद्रांच्या प्राचार्य, समन्वयक व IT Co-ordinator यांची बैठक दि. ०४/१०/२०१६ रोजी आयोजित करण्यात येवून सर्व संबधितांना याबाबत प्रात्यक्षिकासह योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

७. ऑक्टो./नोव्हें., २०१६ मध्ये होणाऱ्या अव्यावसायिक परीक्षांच्या मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रांचे निश्चितीकरण करण्यात आले.

८. आगामी दीक्षांत समारंभाकरिता अर्ज स्विकारण्याकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरुन घेण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

९. दि. १८ ऑक्टोबर, २०१६ पासून सुरु होणाऱ्या परीक्षांकरिता सर्व केंद्रावरील अंतर्गत व बहिस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक तसेच भरारी पथकांचे नामनिर्देशन होवून त्यांना आदेश पारीत करण्यात आले आहेत.

**"ई" ग्रंथालय व संकुले:**

१. ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंती निमित्त- McGraw-Hill॰s Publishing Company-Mumbai येथील Area Manager Mr. Manish Asnani & Key Account Manager- Mr. Santhosh Joshi यांचे e-Learning Resources for -RUSA या विषयावरील व्याख्यान व कार्यशाळा दि. ०९/०८/२०१६ रोजी संपन्न झाली.

२. राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (RUSA) अंतर्गत ₹४७,५०,८४३/- इतक्या रकमेची e-Books व ₹२१,६८,९४८/- Print Foreign Journals खरेदी करण्यात आली आहेत.

३. सन २०१६-१७ या चालू शैक्षणिक वर्षामधील विद्यापीठातील पदव्युत्तर वर्गाचे विद्यार्थी व संशोधक यांना ओळखपत्र (RFID-Smart Card) देण्यात आले आहेत.

४. ग्रंथालय विभागात दि. १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस “वाचन प्रेरणा दिन” म्हणून मा. कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

५. रसायनशास्त्र संकुलाकडे एम.फिल. रसायनशास्त्र या विषयाकरीता १ विद्यार्थी प्रवेशित झाला आहे.

६. दि. १७/०८/२०१६ ते १९/०८/२०१६ रोजी पर्यंत Sustainable Water, Wastewater and Energy Management-२०१६ या संशोधनपर विषयावर आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व परिषद, बंगळूर येथे आयोजित करण्यात आले होते. प्रा. डॉ. पी. प्रभाकर यांनी सदर प्रदर्शन व परिषदेस उपस्थित राहून Ground Water Quality of Shelgi Nala Basin, Solapur, Maharashtra या विषयावर पेपर प्रेझेंटेशन केले आहे. सदर प्रदर्शन व

परिषदेमध्ये प्रा. डॉ. पी. प्रभाकर यांनी दोन्ही तांत्रिक सेक्शनमध्ये चेअरमन म्हणून कार्यभार पाहिले.

७. भूशास्त्र संकुलातील डॉ. आर. एस. गवळी (समन्वयक, ISRO-EDUSAT) यांच्या मार्गदर्शनाखाली ISRO-EDUSAT १८ व्या अभ्यासक्रमासाठी “बेसिक ऑफ आरएस, जीआयएस” कोर्सकरिता एकूण ६० विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन फॉर्म भरण्यात आले आहे. या कोर्सची सुरुवात दि. २२/०८/२०१६ पासून झाली आहे.

८. दि. १६/१०/२०१६ रोजी “जागतिक ओझोन दिवस” या दिनानिमित्त भूशास्त्र संकुलातील विद्यार्थ्यांकडून ओझोन दिवस साजरा करण्यात आला. जागतिक ओझोन दिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांमध्ये पोष्टर स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, वक्तृत्व व निबंध स्पर्धा इत्यादीकरिता विद्यार्थ्यांनी विविधांगी व्यक्तिमत्व गुणाचा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला. या स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संकुलातील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले व मार्गदर्शन केले.

९. डॉ. जी. एस. राव (Prithvi Geospatial, Mumbai) यांनी पाहुणे व्याख्याता म्हणून दि.१९/०९/२०१६ रोजी Modern Instruments used in Chemical Analysis आणि Environmental Geochemistry या दोन विषयावर HPLC आणि Case Studies of Geochemistry या विषयावर भूशास्त्र संकुलात व्याख्यान देवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

१०. जागतिक वन्यजीव आठवडा या निमित्ताने वन्यजीव संरक्षण, संवर्धन आणि त्यांच्या बद्दल जनजागृती या हेतूने भूशास्त्र संकुलामध्ये बी.एन.एच.एस.(BNHS), मुंबई या स्वयंसेवी संस्था (NGO) व भूशास्त्र संकुल यांच्या माध्यमातून दि. ०६/१०/२०१६ रोजी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस प्रकल्प अधिकारी आणि शास्त्रज्ञ श्री. सुजीत नरवडे यांचे व्याख्यान घेण्यात आले. तसेच दोन विषयांवर पोस्टर्स स्पर्धा घेण्यात आल्या. या कार्यशाळेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मा. कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याहस्ते पारितोषिक देण्यात आले. या कार्यशाळेस सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोंदविली. सदरील कार्यशाळेसाठी उपस्थितांचे संकुलातील शिक्षकांनी आभार मानले.

११. सामाजिकशास्त्रे संकुलातील जनसंज्ञापन (मास कम्युनिकेशन) विभाग आणि किर्लोस्कर-वसुंधरा आंतरराष्ट्रीय पर्यावरण चित्रपट महोत्सव यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २० ऑगस्ट, २०१६ रोजी पर्यावरण पत्रकारिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत पर्यावरण तज्ञ अभिजित घोरपडे, मुख्य वनसंरक्षक सुनिल लिमये, शेतीमित्र मासिकाचे संपादक प्रमोद पाटील, दै. सकाळचे सहयोगी संपादक अभय दिवाणजी, समीर इनामदार, विनोद कामतकर इत्यादींनी मार्गदर्शन केले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी मा.कुलगुरु प्रा. डॉ. एन. एन. मालदार होते.

१२. सामाजिकशास्त्रे संकुलातील जनसंज्ञापन विभाग आणि भारत सरकारच्या पत्रसुचना कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ ऑगस्ट, २०१६ रोजी ग्रामीण पत्रकारिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्‌घाटन मा.कुलगुरु प्रा.डॉ. एन. एन. मालदार यांच्या हस्ते झाले. कार्यशाळेत ज्येष्ठ पत्रकार श्री निशिकांत भालेराव, अरविंद जोशी, शेतीमित्र मासिकाचे संपादक प्रमोद पाटील, लोकमतेचे संपादक राजा माने, सोलापूर आकाशवाणी केंद्राचे केंद्र संचालक सुनील शिनखेडे आदींनी मार्गदर्शन केले.

१३. सामाजिकशास्त्रे विभागातील जनसंज्ञापन विभागातर्फे मतदार जागृती या विषयावर तीन लघुपट (शॉर्ट फिल्म) तयार करण्यात आले आहेत. तसेच या विभागातर्फे “स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत माध्यमांची भूमिका” याबाबत संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

१४. एम.ए. मास कम्युनिकेशन प्रथम व द्वितीय वर्ष अभ्यासक्रमाच विद्यार्थी व डॉ. आर. बी. चिंचोळकर, श्री. अंबादास भासके व श्री. मधुकर जक्कन यांनी दि. ११ व १२ सप्टेंबर, २०१६ रोजी पुणे, आळंदी व भीमाशंकर येथे फिल्ड वर्क साठी भेट दिली.

१५. इतिहास आणि पुरातत्वशास्त्र या विभागाचे एम. ए. भाग १ व भाग २ चे विद्यार्थी, कु. ज्ञानेश्वरी हजारे व डॉ.माया पाटील यांनी (Field Work साठी) दि. ०१/०९/२०१६ रोजी दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग कुडल येथील प्राचीन मंदिरे तसेच शिलालेख अभ्यासण्यासाठी भेट दिली.

१६. सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती, सोलापूर व लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०१ सप्टेंबर, २०१६ रोजी कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर येथे शिक्षक दिनानिमित्त आयोजित गुणवंत शिक्षकांचा सत्कार कार्यक्रमामध्ये अर्थशास्त्र विभागाचे विभागप्रमुख, डॉ. सी. एस. भानुमते यांचा गुणवंत शिक्षक म्हणून सत्कार करण्यात आला.

१७. सामाजिकशास्त्रे संकुलातर्फे दि. २२ व २३ सप्टेंबर, २०१६ रोजी Human Rights and Humanizing Society या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा सोलापूर विद्यापीठात आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत “मानवी हक्क आयोग, महाराष्ट्र” अध्यक्ष, श्री. बेन्नुरमठ, सदस्य, श्री. सईद, श्री. भगवंतराव मोरे, डॉ. बद्रुद्दीन, डॉ.मुज्जफर असादी, डॉ. सुधीर जेकब, डॉ. शिवप्रसाद आणि श्री.बाळकृष्ण रेणके इत्यादींनी मार्गदर्शन केले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी मा.कुलगुरु प्रा.डॉ. एन. एन. मालदार होते. डॉ. माया पाटील व डॉ. पी.जी.व्हनकडे यांनी सदर कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम पाहिले.

१८. संशोधन उत्सव (Avishkar २०१६) करीता दि. ०७/१०/२०१६ रोजी संकुलातील एम.ए. भाग १ व भाग २ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थी आणि एम. फिल, पीएच.डी. चे सर्व संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाचे सादरीकरणाचे (PPT Presentation) केले. सदर विद्यार्थ्यांमधून संशोधन उत्सव (Avishkar २०१६) साठी उत्कृष्ट सादरीकरण केलेल्या एकूण १४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. डॉ. सी.एस. भानुमते सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख, अर्थशास्त्र यांनी आविष्कार समन्वयक म्हणून काम पाहिले.

१९. दि. २८ सप्टेंबर, २०१६ रोजी डॉ. व्ही.बी. जुगळे यांनी सामाजिकशास्त्रे संकुलामध्ये आयोजित कार्यक्रमामध्ये संकुलातील एम.ए. भाग १ व भाग २ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांशी चर्चा केली.

२०. वाणिज्य व व्यवस्थापन संकुलामध्ये Commerce Forum ची स्थापना दि. २३/०८/२०१६ रोजी करण्यात आली व त्याचे उद्घाटन मा. कुलसचिव डॉ. डी. एन. मिश्रा यांच्या हस्ते करण्यात आले.

**"फ" विद्यार्थी कल्याण विभाग:**

१. सोलापूर विद्यापीठाचा तेरावा युवा महोत्सव (उन्मेष सृजनरंगाचा) दि. ०२ ते ०५ ऑक्टोबर, २०१६ दरम्यान SVERI'S कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर येथे संपन्न होत आहे. सदर महोत्सवात विविध एकूण २७ कलाप्रकाराचे आयोजन करण्यात येणार आहे. या बाबत सर्व संलग्न महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात आले आहे.

२. युवा महोत्सवात मुले ७७८ व मुली ५४२ व संघव्यवस्थापक १७५ असे एकूण १४९५ व्यक्तींनी सहभाग नोंदविला.

३. विद्यापीठाच्या अधिविभागातील विद्यार्थी संघाचे समन्वयक म्हणून डॉ. पी. एन. कोळेकर सहा. प्राध्यापक, इतिहास व पुरातत्वशास्त्र यांनी काम पाहिले. विद्यापीठाच्या अधिविभागातील विद्यार्थी संघाने युवा महोत्सवातील विविध स्पर्धेमध्ये एकूण सहा पारितोषिके पटकावली.

४.

| | | |
|---|---|---|
| **अ** | **विद्यापीठाचे पाच सर्वसाधारण फिरते चषक मिळविणारे महाविद्यालयाचे नाव** | |
| १. | ललीत | संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर |
| २. | वाङ्मय | श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी |
| ३. | नाट्य | श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी |
| ४. | नृत्य | श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी |
| ५. | संगीत | संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर |
| **ब** | **सर्वसाधारण विजेतेपद मिळविणारे महाविद्यालयाचे नाव** | |
| १. | प्रथम | श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी |
| २. | द्वितीय | वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर |
| ३. | तृतीय | शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलुज |

अ नुसार महोत्सवात विद्यापीठाचे पाच सर्वसाधारण फिरत्या चषकाचे वितरण करण्यात आले.

ब नुसार सर्वसाधारण विजेतेपद मिळविणाऱ्या महाविद्यालयांना तीन चषकाचे वितरण करण्यात आले.

५. मा. कुलपती कार्यालय, मुंबई आयोजित आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य युवा महोत्सव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे दि. ०५/११/२०१६ ते दि.०९/११/२०१६ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. युवा महोत्सवात विविध कलाप्रकारात संघात एकूण ३४ विद्यार्थी/विद्यार्थिनी कलाकार, २ संघव्यवस्थापक व ४ साथीदार सहकारी असा एकूण ४० व्यक्तींचा संघ सहाभागी होत आहे. या सर्व संघाच्या १५ दिवसाच्या सराव शिबीराचे आयोजन दि. १६/१०/२०१६ ते दि. ०४/११/२०१६ या दरम्यान सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर येथे करण्यात आले आहे.

मा.कुलगुरुमहोदयांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

**[ १ ] अधिसभेच्या दि.२६ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या तेराव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

(टिपणी: सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र.सोविसो/ सनिवि/अधिसभा/८३७०, दि.०१/०९/२०१६ अन्वये, दि.२६ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या तेराव्या बैठकीचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.२९/०९/२०१६ अशी होती. या मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत.

सबब, अधिसभेचा दि.२६ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या तेराव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेसाठी सादर).

**ठराव: अधिसभेच्या दि.२६ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या तेराव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.**

**[ २ ] श्री. सुशीलकुमार संभाजीराव शिंदे यांना डी. लिट. (D. Litt.) या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: ख्यातनाम व्यक्तींनी त्यांच्या क्षेत्रात केलेल्या समाजोपयोगी व इतर कार्याची नोंद घेवून त्यांना मानद पदवीने सन्मानित करण्याचा जगभरातील विद्यापीठांना मिळालेला एक शैक्षणिक विशेषधिकार आहे. त्यानुषंगाने सोलापूर विद्यापीठाच्या स्थापनेला १२ वर्षे पूर्ण झालेली आहेत आणि आतापर्यंत या विद्यापीठाने कोणालाही डी. लिट. (D. Litt.) या मानद पदवीने सन्मानित केलेले नाही, ही बाब विचारात घेवून व्यवस्थापन परिषदेने दि.२५/१०/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम ९७(१) च्या तरतूदीनुसार श्री. सुशीलकुमार संभाजीराव शिंदे यांना डी. लिट. (D. Litt.) या मानद पदवीने सन्मानित करण्याचा विचार करुन सर्वानुमते तशी शिफारस अधिसभेस केलेली आहे.

श्री. सुशीलकुमार संभाजीराव शिंदे यांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे.

श्री. सुशीलकुमार संभाजीराव शिंदे यांना उत्कृष्ट खासदार म्हणून "National Citizen Award" या पुरस्काराने मदर तेरेसा यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यांना आतापर्यंत बरेच पुरस्कार मिळाले असून ते एक नामांकित व्यक्ती असून त्यांनी समाजासाठी आणि देशासाठी बहूमोल असे योगदान दिलेले आहे.

श्री. सुशीलकुमार संभाजीराव शिंदे हे टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे आणि आंध्र प्रदेशातील सर्व सार्वजनिक विद्यापीठाचे कुलपती होते. त्यांना आतापर्यंत चार विद्यापीठाने डी. लिट. (D. Litt.) या मानद पदवीने सन्मानित केले आहे. त्यांनी अनेक वेळा युनोमध्ये भारत देशाचे प्रतिनिधीत्व केले आहे.

श्री. सुशीलकुमार संभाजीराव शिंदे यांना डी. लिट. (D. Litt.) या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेने दि.२५/१०/२०१६ रोजीच्या बैठकीत अधिसभेस सर्वानुमते केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव: **श्री. सुशीलकुमार संभाजीराव शिंदे यांना डी. लिट. (D. Litt.) या मानद पदवीने सन्मानित करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ३ ] सोलापूर विद्यापीठाच्या सन २०१४-१५ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक स्वरुपात) तयार केलेला ११ व्या वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे.

"ही अधिसभा वार्षिक अहवाल समितीने व व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेवून असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठाच्या ११ व्या वार्षिक अहवालाबाबत केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणी: सोलापूर विद्यापीठाचा सन २०१४-१५ चा ११ वा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. ए. ए. शेख | अध्यक्ष |
| २) | डॉ. श्रीकांत येळेगावकर | सदस्य |
| ३) | डॉ. डी. जी. कदम | सदस्य |
| ४) | डॉ. सुहास पुजारी | सदस्य |
| ५) | डॉ. आर. एस. मेंते | सदस्य |
| ६) | डॉ. सु. नं. कांबळे | सदस्य- सचिव |

सदर समितीने तयार करुन दिलेला वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.२५/१०/२०१६ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.१० नुसार विचारार्थ ठेवला असता खालीलप्रमाणे ठराव झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र.१० | वार्षिक अहवाल तयार करण्याकरिता गठीत केलेल्या समितीने तयार केलेला सोलापूर विद्यापीठाचा सन २०१४-१५ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक स्वरुपात) तयार केलेला ११ वा वार्षिक अहवाल स्विकारुन अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. |

सबब, सोलापूर विद्यापीठाचा सन २०१४-१५ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक स्वरुपात) तयार केलेला ११ वा वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव: **सोलापूर विद्यापीठाचा सन २०१४-१५ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक स्वरुपात) तयार केलेला ११ वा वार्षिक अहवाल प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील यांनी सादर केला त्यास मा. श्री. प्रशांत परिचारक यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा प्रस्ताव दुरुस्तीसह सर्वानुमते मान्य करण्यात आला.**

**[ ४ ] महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम २७ (१) (एच) नुसार, व्यवस्थापन परिषदेवर अधिसभेने विद्यापीठ विभागाचे किंवा विद्यापीठाच्या परिसंस्थांचे प्रमुख किंवा संचालक यांच्यामधून करावयाच्या नामनिर्देशनाबाबत.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठाच्या विविध अधिकारमंडळाची मुदत दि.३१ ऑगस्ट, २०१५ रोजी संपुष्टात आली. यानंतर निवडणूक प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ निरसित करुन नव्याने महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१५ विधानमंडळात सादर करुन मान्यता घेण्याकरिता दि.३१ ऑगस्ट, २०१६ पर्यंत अधिकारमंडळाच्या कोणत्याही पध्दतीने निवडणूका घेऊ नयेत व तोपर्यंत पदसिध्द सदस्य कार्यरत राहतील असे दि.१७ ऑगस्ट, २०१५ च्या राजपत्रात प्रसिध्द करुन दि.२५ ऑगस्ट, २०१५ च्या पत्रान्वये विद्यापीठांना कळविले होते.

दि.३१ ऑगस्ट, २०१६ पर्यंत देखील नवीन विद्यापीठ अधिनियम विधानपरिषदेत मंजूर न झाल्याने पुनश्च: शासनाने दि.०१ ऑक्टोबर, २०१६ रोजी राजपत्र प्रसिध्द केले असून या राजपत्रानुसार दि.३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत अधिकारमंडळाच्या कोणत्याही निवडणूका घेऊ नयेत असे कळवून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ नुसार नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रिया पूर्ण करावी आणि नामनिर्देशित केलेले / स्वीकृत केलेले सदस्य यांची सदस्यत्वाची मुदत नवीन विद्यापीठ अधिनियमानुसार गठीत होणाऱ्या अधिकारमंडळापर्यंत किंवा दि. ३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहील असे नमूद केले आहे. त्यानुसार, सोलापूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम २७ (१) (एच) नुसार, अधिसभेने विद्यापीठ विभागाचे किंवा विद्यापीठाच्या परिसंस्थांचे प्रमुख किंवा संचालक यांच्यामधून एका विभागप्रमुखाचे किंवा एका संचालकाचे नामनिर्देशन करावयाचे आहे.

दि.१४ सप्टेंबर, २००९ च्या महाराष्ट्र शासन आदेशानुसार, कलम २७ (१) (एच) नुसार, विद्यापीठ विभागाचे किंवा विद्यापीठाच्या परिसंस्थांचे प्रमुख किंवा संचालक यांच्यामधून एका विभागप्रमुखाचे किंवा एका संचालकाच्या नामनिर्देशनासाठी खालीलप्रमाणे पात्रता असणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| २७ (१) (ज) (h) प्रमुख / संचालक - १ | **नामनिर्देशन - अधिसभेद्वारे**<br>१. विद्यापीठ विभागाचे प्रमुख किंवा परिसंस्थांचे संचालकांमधून.<br>२. पीएच.डी. अर्हता धारक.<br>३. संबंधीत विषय / क्षेत्रात शिक्षणतज्ञ वैज्ञानिक क्षेत्रातील तज्ञ असावा व तसे प्रमाणित करावे.<br>४. अध्यापनाचा १५ वर्षाचा अनुभव.<br>५. राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय संशोधन जर्नलस मध्ये बारकाईने पुनर्विलोकन केलेले किमान ३ संशोधन पेपर प्रकाशित केलेले असावेत. |

सबब, सोबतच्या विभागप्रमुखांच्या यादीतून अधिसभेवर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव:** **महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम २७ (१) (एच) नुसार, व्यवस्थापन परिषदेवर विद्यापीठ विभागाचे किंवा विद्यापीठाच्या परिसंस्थांचे प्रमुख किंवा संचालक यांच्यामधून नामनिर्देशन करण्याकरिता डॉ. ए. ए. घनवट यांचे नाव प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील यांनी सुचविले त्यास श्री. एच. बी. मते यांनी अनुमोदन दिले.**

**अधिसभेच्या उपस्थित सदस्यांमधून इतर कोणतेही नाव सुचविण्यात न आल्यामुळे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम २७ (१) (एच) नुसार, व्यवस्थापन परिषदेवर विद्यापीठ विभागाचे किंवा विद्यापीठाच्या परिसंस्थांचे प्रमुख किंवा संचालक यांच्यामधून डॉ. ए. ए. घनवट यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ ५ ] महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळावर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ३५ (२) (j a) नुसार अधिसभेच्या दोन सदस्यांचे (यापैकी एक संस्था प्रतिनिधी) यांच्या नामनिर्देशनास्तव.**

टिपणी: सोलापूर विद्यापीठाच्या विविध अधिकारमंडळाची मुदत दि.३१ ऑगस्ट, २०१५ रोजी संपुष्टात आली. यानंतर निवडणूक प्रक्रिया सुरु करण्यात आली होती. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ निरसित करुन नव्याने महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१५ विधानमंडळात सादर करुन मान्यता घेण्याकरिता दि.३१ ऑगस्ट, २०१६ पर्यंत अधिकारमंडळाच्या कोणत्याही पध्दतीने निवडणूका घेऊ नयेत व तोपर्यंत पदसिध्द सदस्य कार्यरत राहतील असे दि.१७ ऑगस्ट, २०१५ च्या राजपत्रात प्रसिध्द करुन दि.२५ ऑगस्ट, २०१५ च्या पत्रान्वये विद्यापीठांना कळविले होते.

दि.३१ ऑगस्ट, २०१६ पर्यंत देखील नवीन विद्यापीठ अधिनियम विधानपरिषदेत मंजूर न झाल्याने पुनश्च: शासनाने दि.०१ ऑक्टोबर, २०१६ रोजी राजपत्र प्रसिध्द केले असून या राजपत्रानुसार दि.३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत अधिकारमंडळाच्या कोणत्याही निवडणूका घेऊ नयेत असे कळवून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ नुसार नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रिया पूर्ण करावी आणि नामनिर्देशित केलेले / स्वीकृत केलेले सदस्य यांची सदस्यत्वाची मुदत नवीन विद्यापीठ अधिनियमानुसार गठीत होणाऱ्या अधिकारमंडळापर्यंत किंवा दि.३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहील असे नमूद केले आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ३५ (२) (j a) नुसार, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळावर दोन सदस्यांचे (यापैकी एक संस्था प्रतिनिधी) नामनिर्देशन करावयाचे असून त्यासाठी दि.१४ सप्टेंबर, २००९ च्या आदेशानुसार खालीलप्रमाणे पात्रता असणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| S.35 (2) (ja) - Members (Two) | Nominated by - Senate<br>1. One being representative of the Managements.<br>2. Shall be office bearer of Educational Institution of 10 years standing at degree level.<br>3. Minimum 5 years experience as Chairman / Secretary of Institution. |

सबब, वरीलप्रमाणे नामनिर्देशनास्तव).

ठराव: महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळावर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ३५ (२) (j a) नुसार अधिसभेच्या दोन सदस्यांपैकी एक संस्था प्रतिनिधी व्यतिरिक्त सदस्याचे नामनिर्देशन करण्याकरिता डॉ. व्ही. बी. घुटे यांचे नाव प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील यांनी सुचविले व त्यास श्री. एच. बी. मते यांनी अनुमोदन दिले. इतर कोणतेही नाव सभागृहात सुचविण्यात न आल्याने डॉ. व्ही. बी. घुटे यांचे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळावर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ३५ (२) (j a) नुसार नामनिर्देशन करण्यात आले.

अधिसभेवर संस्था प्रतिनिधी संवर्गातून एकही सदस्य नसल्याने महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळावर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ३५ (२) (j a) नुसार संस्था प्रतिनिधी संवर्गातील पद रिक्त ठेवण्यात आले.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सही/-
कुलसचिव
सचिव, अधिसभा

सही/-
मा. कुलगुरु
अध्यक्ष, अधिसभा